# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 20 November 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २० नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.**

****

राज्यात २८८ विधानसभा मतदार संघांसोबत नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उत्साहात मतदान होत आहे. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. राज्यात सकाळी ११ वाजेपर्यंत १८ पू १४ टक्के मतदानाची नोंद झाली.

संपूर्ण मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी निवडणूक आयोग आणि पोलीस यंत्रणेनं चोख व्यवस्था केली आहे, मात्र, काही ठिकाणच्या मतदान केंद्रांवरची ईव्हीएम यंत्रं बंद पडून मतदारांचा काही वेळ खोळंबा झाल्याचं वृत्त आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरच्या पैठण तालुक्यातल्या दादेगाव बुद्रुक इथल्या २२६ क्रमांकाच्या केंद्रासह अकोला पश्चिम, मालेगाव बाह्य, जळगावच्या जामनेर आणि कोल्हापूर उत्तर मतदारसंघातल्या काही मतदान केंद्रांचा समावेश आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सकाळी ११ वाजेपर्यंत १८ पूर्णांक १८ टक्के मतदान झालं. जिल्ह्यात मतदान प्रक्रिया शांततेत सुरू आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी वेब कास्टिंगद्वारे जिल्ह्यातल्या मतदान केंद्रांचं निरीक्षण केलं, तसंच सहकुटुंब मतदान केलं. सिल्लोडचे महायुतीचे उमेदवार अब्दुल सत्तार, महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश बनकर, औरंगाबाद पूर्व मतदारसंघाचे एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलिल, खासदार संदीपान भुमरे, विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही मतदानाचा हक्क बजावला.

सकाळी ११ वाजेपर्यंत बीड जिल्ह्यात १७ पूर्णांक ४१ टक्के, हिंगोली - २१ पूर्णांक २० टक्के, जालना - २१ पूर्णांक २९ टक्के, लातूर - १८ पूर्णांक ५५ टक्के, धाराशिव - १७ पूर्णांक शून्य सात टक्के, तर परभणी जिल्ह्यात सकाळी ११ वाजेपर्यंत १८ पूर्णांक ४९ टक्के मतदान झालं.

नांदेड जिल्ह्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी एकत्र मतदान होत आहे. जिल्ह्यात सकाळी ११ वाजेपर्यंत विधानसभेसाठी १३ पूर्णांक ६७ टक्के, तर लोकसभा पोटनिवडणुकीत १२ पूर्णांक ५९ टक्के मतदान झालं. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे यांनी मतदानाचा हक्क बजावला.

परभणी शहरात मतदारांनी उत्साह दाखवत मतदान केंद्रांवर लांबच लांब रांगा लावल्याचं चित्र दिसून येत आहे. जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मतदान केंद्रांवर सुंदर सजावट करून फुगे लावण्यात आले असून, सुंदर रांगोळ्या काढण्यात आल्या आहेत तसंच सेल्फी पॉइंट उभारण्यात आले आहेत.

हिंगोली शहरात सकाळपासून मतदानाला उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कळमनुरी विधानसभा मतदारसंघात मौजे हिवरा इथं विठ्ठल मुंडे या १०५ वर्षाच्या वृद्ध नागरीकाने मतदानाचा हक्क बजावला.

उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास घाडगे पाटील, लातूर शहर मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार अमित देशमुख यांनी मतदान केलं.

धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा शहरात विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था या ठिकाणी असलेल्या मतदान केंद्रावरच्या मतदान यंत्रात बिघाड झाल्यामुळे सुमारे अर्धा तास मतदान थांबलं होतं, मात्र बिघाड दुरुस्त झाल्यावर मतदान सुरळीत सुरू झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

बीड मतदार संघातल्या धर्मापुरी इथं मतदान केंद्रातले सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचं आढळून आल्यानंतर, महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी मतदान प्रक्रिया बंद ठेवण्याचा आग्रह केला, मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून सीसीटीव्ही कॅमेरे पुन्हा पूर्ववत सुरू केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

लातूर जिल्ह्यात सर्वत्र शांततेत मतदान सुरू आहे. लातूरच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी लातूर शहरातल्या विविध मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान प्रक्रियेची पाहणी केली.

जालना जिल्ह्यातल्या प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांच्या मदतीसाठी स्काउट गाईड चे तीन विद्यार्थी नियुक्त करण्यात आले आहेत. हे विद्यार्थी दिव्यांग मतदारांना व्हील चेअर वरुन मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासह अन्य मदतही करत आहेत. जालना

शहरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात मतदारांसाठी सेल्फी पॉइंट तयार करण्यात आला आहे.

****

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी देखील आज मतदान होत असून, या टप्प्यात १२ जिल्ह्यांमधल्या ३८ मतदारसंघांचा समावेश आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत झारखंडमध्ये ३१ पूर्णांक ३७ टक्के मतदानाची नोंद झाली.

****

पंचावन्नाव्वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात ईफ्फी आजपासून गोव्यात सुरू होत आहे. हा महोत्सव २८ नोव्हेंबरपर्यंत चालेल. या महोत्सवात ८१ देशांचे १८० चित्रपट दाखवले जाणार आहेत.

****